डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

# अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय यवतमाळ

वाघापूर रोड, यवतमाळ-४४५००१(महाराष्ट्र)

डॉ. व्हि. पी. माने
सहयोगी अधिष्ठाता

ई-मेल : coftytl@gmail.com
coftoffice@gmail.com

जा.क्रं/अ.त.म./आस्था/ 344 /२०२२
दिनांक : 11 /१०/२०२२

## दरपत्रक सुचना

प्रति,

मे. ______________________

______________________

______________________

विषय :–अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ या कार्यालयाकरीता सहकारी संस्था/ठेकेदार / कंपणीमार्फत ठेकेपध्दतीने बाहयस्त्रोतामार्फत मनुष्यबळ पुरविण्यासाठी निविदा/ दरपत्रक सादर करणेबाबत.......

सुचनेव्दारे खाली नमुद केल्यानुसार महाविद्यालयीन कामाकरीता सहाकारी संस्था/ठेकेदार/कंपनी या बाहयस्त्रोतांकडून मनुष्यबळ पुरविण्यासाठी निविदा /दरपत्रक या कार्यालयास दि. १९ /१०/२०२२ रोजी ११.०० वाजे पर्यंत किंवा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावे.

| अ. क्र. | मनुष्यबळ | कामाचे विवरण | अर्हता | संख्या | मानधन प्रति महिना |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा परिचर | प्रयोगशाळा स्वच्छ करणे, प्रयोगशाळेतील उपकरणे स्वच्छ करणे, प्रयोगशाळेत मदत करणे, कार्यालयीन स्वच्छता करणे इ. | एस.एस.सी. उत्तीर्ण अनुभवास प्राधान्य | ०४ | |
| २ | परिचर | महाविद्यालयीन साफसफाई करणे, परिसर स्वच्छताइ. | ८ वा वर्ग अनुभवास प्राधान्य | ०२ | |
| ३ | ग्रंथालय सेल्फ सहायक | ग्रंथालयीन कामकाजात ग्रंथालय व सहायक ग्रंथपाल यांना मदत करणे, ग्रंथालयीन स्वच्छता, संगणक ज्ञान आवश्यक,Online Data Entry करणे इ. | एच.एस.सी उत्तीर्ण, MSCIT अनुभवास प्राधान्य | ०१ | |
| टिप : महाविद्यालयाच्या गरजेनुसार मनुष्यबळांची संख्या कमी अधिक होऊ शकते. | | | | | |

सुचना:–

१. अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ हि डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत शासकीय शैक्षणिक संस्था असल्यामुळे GST Act Notification No. 12/2017 Central Tax (Rate) Dated 28/06/2017 नुसार GSTलागू नाही. सेवा पूरविणाऱ्या पुरवठादारास नियमाप्रमाणे सर्व कर भरणे अनिवार्य राहील.

२. अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ पदनिर्मीती बाबतचा शासन निर्णय दि. २० सप्टेंबर, २०१९ च्या अनुषंगाने जास्तीत जास्त मानधन दर १०२२५/– प्रति महिना/व्यक्ती

३. दरपत्रके सिलबंद पाकीटात पाठवावीत.

४. दरपत्रकाच्या पाकीटावर या निविदा सुचनेचा संदर्भ क्रं. नमुद करावा. निवीदा दरपत्रकातील मानधन सर्व करांसहीत असावेत. ज्या सेवांना **(GST)**लागू आहे त्याबाबतच **(GST)**नमुद करावे.

५. दरपत्रकांसोबत संस्थेचे नोंदनी प्रमाणपत्र, जी.एस.टी., भविष्य निर्वाह नोंदणी, अनुभव प्रमाणपत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड इ. प्रमाणपत्र, जोडण्यात यावे.

६. निविदा दरपत्रकेसहयोगी अधिष्ठाता अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ यांचे नावाने दयावे. तसेच पाकीटावर **"मनुष्यबळपुरविण्याकरिता दरपत्रक"** असे नमुद करावे. तसेच दरपत्रकावर मोबाईल क्र. नमुद करावा.

७. कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे, तसेच निविदा प्रक्रीया कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरी धारकाकडे राखीव ठेवण्यात आले आहेत.

८. लिफाफा १ तांत्रिक दस्तावेज
लिफाफा २ दरपत्रक
लिफाफा ३ या लिफाफ्यातमध्ये लिफाफा १ व लिफाफा २ सिलबंद करून या मध्ये टाकून वर स्पष्ट अक्षरात " मनुष्यबळ पुरवठा दरपत्रक" लिफाफा १ व लिफाफा २ आत आहे असे लिहावे.

**अटी व शर्ती :–**

१. सदर कामे ही दैनंदीन स्वरुपाची असतील व शासकीय नियमाप्रमाणे दैनंदिन आठ तासाचे काम राहील.

२. कुठल्याही दिवशी मनुष्यबळाचे कामावर हजर राहणे शक्य होत नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तिची व्यवस्था किंवा कामावर हजेरी लावण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची राहील.

३. सदर कामे ही पुर्णत: बाहयस्त्रोतांकडुन असल्याकारणाने वरिष्ठता यादीत कामाची अथवा कामावरच्या हजेरीची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही.

४. काम समाधानकारक नसल्यास कोणत्याही पुर्व सुचनेशिवाय मनुष्यबळाला कामावरून काढुन टाकण्याचे संपूर्ण अधिकार सहयोगी अधिष्ठाता, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ यांचे कडे राहतील.

५. मानधन वेळेवर पुरविण्यात यावे.

६. कामावरील मनुष्यबळाचेअपघात विमा, भ.नि.नि. खाते, व्यवसाय कर व वेळोवेळी शासन निर्णयानुसार देय लाभ उपलब्ध करुन देण्याची संपुर्ण जबाबदारी सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदार संस्था /कंपणी/ ठेकेदार यांची राहील.

७. सदर मनुष्यबळपुरविणारी संस्था नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. नोंदणीचे प्रमाणपत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे. तसेच GST नोंदणी संदर्भातील दस्तऐवज सोबत जोडण्यात यावेत. सदर दरपत्रक दि. १९/१०/२०२२ रोजी दुपारी १४.०० वाजता सहयोगी अधिष्ठाता यांचे कक्षात उघडण्यात येईल.

८. अपुर्ण/त्रृटी अथवा संबंधीत दस्तावेज न जोडलेली दरपत्रके रदद करण्यात येईल व अशा पुरवठादाराचे लिफाफा क्र. २ दरपत्रक उघडण्यात येणार नाही.

९. सदर संस्था/कंपनी /ठेकेदार असमाधानकारक काम करीत असेल तर सदर संस्थेचे कंत्राट कोणत्याही क्षणी रदद करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकर्त्याकडे असतील.

सहयोगी अधिष्ठाता
अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ

प्रतिलिपी:–

प्रभारी अधिकारी, (ARIS Cell)प्रभारी डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना सदर निविदा विद्यापीठ संकेतस्थळावर अपलोड करण्याच्या विनंतीसह अग्रेषीत.